सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in


---

संदर्भ क्र.: परीक्षा/छावता/३२६३ दिनांक : ०८/१०/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ (पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.**

संदर्भ : १.मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. समिती–२०२६/ प्र.क्र.८२/मदत–२, दिनांक २५ सप्टेंबर, २०२६
२.मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिंस/शिष्य–२०२६–अवर्षण–परीक्षा शुल्क–२०२६–२७/ई१३२१७१६, दिनांक ३० सप्टेंबर, २०२६
३.या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/३२३५, दिनांक ०१/१०/२०२६.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय शासन निर्णय व पत्रान्वये प्राप्त आदेशास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, विषयांकित बाबींसदंर्भातील मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक समिती–२०२६/प्र.क्र.८२/मदत–२, दिनांक २५ सप्टेंबर, २०२६ आणि मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिंस/शिष्य–२०२६–अवर्षण–परीक्षा शुल्क–२०२६–२७/ई१३२१७१६, दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ सोबत अवलोकनार्थ संदर्भिय पत्र क्रमांक ३ अन्वये जोडलेले होते.

१. संदर्भीय शासन निर्णय व पत्राचे अवलोकन करुन त्यामध्ये नमूद निर्देशांनुसार परीक्षा शुल्काबाबतची आवश्यक ती कार्यवाही व्हावी तसेच **संबंधित दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा व इतर शुल्क आकारण्यात येऊ नये.** महाविद्यालयांनी असे परीक्षा फॉर्म इनवर्ड करतांना सदर विद्यार्थी दुष्काळग्रस्त असल्याचे मार्क केल्यावर सदर विद्यार्थ्यांची परीक्षा व इतर अनुषांगिक शुल्क शुन्य होईल.
२. दुष्काळग्रस्त तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वीच परीक्षा फी व इतर शुल्क भरले आहे, अशा विद्यार्थ्यांना शासनाच्या आदेशानुसार व विहीत प्रक्रियेने प्रतिपुर्ती करण्यात येईल.

संबंधित दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थी हे सदरहू योजनेपासून वंचित राहणार नाहीत, याची सर्वोतपरी दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरबाबतची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह **examinward.unipune.ac.in** या लिंकवरुन दिनांक ५ नोव्हेंबर, २०२६ पर्यत काळजीपूर्वक भरुन प्राधान्याने सादर करण्यात यावी.

कळावे,

आपला,

(डॉ. राजेंद्र तलवारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ